# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा

पत्र पेटी क्र.- ५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in

**अतिमहत्वाचे**

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०२०/521

दिनांक :-12 FEB 2020

प्रति,

प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद
उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड
पु.ला.शा.तं.लातूर,.म.तं.नि.लातूर

**विषय** :- राज्य प्रशिक्षण धोरण-२०११ अंतर्गत गट-ब व गट-क संवर्गातील अधिकारी/कर्मचारी करिता उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम ओयाजित करणेबाबत

**संदर्भ**:- १) शासन निर्णय.क्र.टिआरएन-२००९/प्र.क्र.३९/०९/१२/अ, दिनांक २३.०९.२०११
२) या कार्यालयाचे पत्र क्र. विकाऔ/आस्था-३/२०१९/२२८८, दि.१७.७.२०१९
३) या कार्यालयाचे पत्र क्र. विकाऔ/आस्था-३/२०१९/३५६४, दि.०४.१२.२०१९
४) निबंधक, मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, पैठण यांचे पत्र क्र. मप्रविप्रप्र/प्रशिक्षण/नामनि/२०१९-२०/४५, दि.११.०२.२०२०

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय दि.२३.०९.२०११ नुसार शासकीय सेवेतील गट-ब व गट-क संवर्गातील कर्मचा-यांकरिता सन २०१९-२० मध्ये नियोजित प्रशिक्षण सत्रातील माहे फेब्रुवारी २०२० मध्ये अयोजित उजळणी प्रशिक्षणासाठी वरील पत्राचे अवलोकन करुन पत्रातील अटी व शर्ती पुर्तता होत असल्यास आपल्या संस्थेतील ज्या कर्मचा-यांचे अद्याप पर्यंत उजळणी प्रशिक्षण पुर्ण केले नाही अशा कर्मचा-यांचे नावे पाठविणे बाबत सुचित करण्यात आले आहे.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वरील संदर्भिय पत्र क्र. ४ चे अवलोकन करुन तसेच पत्राचे गांभिर्य लक्षात घेऊन आपल्या संस्थेतील जे कर्मचारी हे वरील संदर्भिय पत्रातील अटी व शर्ती याची पुर्तता करित असल्यास खालील विवरणपत्रात अचूक माहिती **तात्काळ प्रथम प्राधान्याने २ दिवसांत दिनांक १४.०२.२०२० पर्यंत ईमेलद्वारे या कार्यालयास सादर करावी.**

| अ क्र | अधिकारी /कर्मचारी यांचे नाव | सद्य पदनाम व संवर्ग (ब/क) | शासकीय सेवेतील प्रथम रुजु दिनांक | रुजु होतानाचा संवर्ग (ब/क/ड) | सद्यसंवर्गात पदोन्नती झाली असल्यास त्याचा दिनांक | अंतिमतः पुर्ण केलेल्या प्रशिक्षणाचा प्रकार व दिनांक (उजळणी/पायभूत/ पदोन्नतीनंरतचे) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

सदर प्रकरणी सर्व प्राथम्याने कार्यवाही करुन तात्काळ माहिती सादर करण्यात यावी, जेणे करुन सदर माहिती मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी पैठण यांना सादर करणे सुलभ होईल. **तसेच आपल्या संस्थेतील कर्मचारी प्रशिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे भविष्यात होणा-या संभाव्य परिणामास संबंधित कर्मचारी / संस्थाप्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. सोबत संदर्भिय पत्राची प्रत जोडली आहे.**

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रतः:- प्रोग्रामर यांना माहिती व या कार्यालयाच्या ई-मेलद्वारे सर्व शासकीय संस्थांना मेल करण्यासाठी

Forwding Letter all instt. 2016/Kakde

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
मराठवाडा प्रशासकिय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी
नाथनगर (उ), पैठण, जि. औरंगाबाद
(विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था)
दुरध्वनी क्र:-०२४३१-२३२२३५,२३२४७६, www.madta.in email :- prabhodini31paithan@gmail.com

जा.क्र.मप्रविप्रप्र/प्रशिक्षण/नामनि/२०१९-२०/ ४५ दिनांक: ११/०२/२०२०

प्रति,

मा.सक्षम अधिकारी,
सर्व कार्यालय/ विभाग,
औरंगाबाद विभाग.

विषय:राज्य प्रशिक्षण धोरण-२०११ अंतर्गत गट-ब व गट-क संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी करिता **उजळणी प्रशिक्षण** कार्यक्रम आयोजित करणे बाबत.

**संदर्भ:-** १.शासननिर्णयक्र.टिआरएन-२००९/प्र.क्र.३९/०९/१२-अ,दि.२३सप्टेबर,२०११
२. शासन परिपत्रकक्रं :टीआरएन-२०१४/३४२/प्र.क्र.५०/१४/१२-अ, दि.२७ मे२०१४
३. शासननिर्णयक्र.-टिआरएन-प्र.क्र.६०/१५/१२-अ,दि.२४जुन,२०१५
४. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.मप्रविप्रप्र/प्रशिक्षण/नामनि/२०१९-२०/५१० दि.२१/११/१९

**मा. महोदय / महोदया,**

संदर्भिय शासननिर्णय दि.२३.०९.२०११ नुसार शासकीय सेवेतील **गट-ब व गट-क संवर्गातील** अधिकारी /कर्मचारीकरीता सन २०१९-२० मध्ये नियोजित प्रशिक्षण सत्रातील माहे फेबुवारी २०२० मध्ये खालील प्रमाणे प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात आली आहे.

| अ.क्र | प्रशिक्षण कालावधी | प्रशिक्षण प्रकार | संवर्ग | नामनिर्देशन करावयाची संख्या | सत्र संचालक |
|---|---|---|---|---|---|
| ९ | १७/०२/२०२० ते २१/०२/२०२० | उजळणी | वर्ग ३ | २० | श्री संदिप काळे |
| १० | २४/०२/२०२० ते २८/०२/२०२० | उजळणी. | वर्ग ३ | २० | श्रीमती शारदा चौंडेकर |
| १० | २४/०२/२०२० ते २८/०२/२०२० | उजळणी | वर्ग २ | १० | श्रीमती शारदा चौंडेकर |

सदरील प्रशिक्षण सत्रे ही २०१९-२० या आर्थिक वर्षातील शेवटची प्रशिक्षण सत्रे असुन यातील गट क संवर्गातील उजळणी सत्रासाठी १० ऐवजी २० कर्मचारी यांना कार्यमुक्त करण्यात यावे. तसेच, आपल्या अधिनस्त अधिकारी /कर्मचारी यांची माहिती अटी व शर्ती नुसार खालील तक्तामध्ये **prabhodini31paithan@gmail.com** या मेल आयडीवर **तात्काळ** पाठविण्यात यावी व त्यांना सदरील प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त करण्यात यावे, हि विनंती.



Scanned by CamScanner

| अ क्र | अधिकारी/ कर्मचारी यांचे नाव | सद्य पदनाम व संवर्ग (ब/क) | शासकीयसेवेतील प्रथम रुजु दिनांक | रुजु होतानाचा संवर्ग (ब/क/ड) | सद्यसंवर्गात पदोन्नती झाली असल्यास त्याचा दिनांक | अंतिमत:पुर्ण केलेल्या प्रशिक्षणाचाप्रकार व दिनांक (उजळणी/पायाभुत/पदोन्नतीनंतरचे) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

**<u>अटी व शर्ती-</u>**

**<u>कृपया संदर्भ क्रं.१ चे अवलोकन व्हावे.</u>**

**अ) उजळणी प्रशिक्षणासाठी-**

१. सदरील प्रशिक्षण हे शासकीय सेवेत त्याच संवर्गात किमान ५ वर्षापसून कार्यरत असलेला अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठीच आहे.त्यांची सद्या कार्यरत असलेल्या संवर्गात मागील ५ वर्षात पदोन्नती झालेली नसावी.

२. <u>सदर प्रशिक्षणार्थी</u> अधिकारी/कर्मचारी <u>यांचा सद्य संवर्गात किमान ५ वर्षाची सेवा पूर्ण होणे आवश्यक आहे व या कालावधीत त्यांनी राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत अशा प्रकारचे कोणतेही प्रशासकीय (उजळणी/पायाभुत/ पदोन्नतीनंतरचे) प्रशिक्षण घेतलेले नसावे.</u>

३. ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीचा कालावधी ३ वर्षे शिल्लक असेल त्यांचे नामनिर्देशन करण्यात येवू नये.

**ब) सर्वसाधारण शर्ती-**

१. सदरचे प्रशिक्षण हे **निवासी प्रशिक्षण** असून प्रशिक्षणदरम्यान संस्थेतील वस्तीगृहात केवळ प्रशिक्षणार्थ्यांनाच राहता येईल.

२. प्रशिक्षणार्थ्यांना कोणत्याही सबबीवर पती/ पत्नी यांना सोबत राहण्यास आणता येणार नाही. परंतु एखाद्या महिला प्रशिक्षणार्थीला ०५ वर्षाखालील अपत्ये सोबत आणने आवश्यकच असल्यास त्यांचा सांभाळ करण्यासाठी महिला नातेवाईक आणता येईल. तथापि त्यांचे रु.२५०/- प्रति दिन प्रमाणे राहण्यासाठीचे शुल्कसंस्थेस अदा करावे लागेल. तसेच त्यांचे जेवणाचे शुल्क स्वतंत्ररित्या भोजनालय धारकाच्या नियमाप्रमाणे अदा करावे लागेल

३. प्रशिक्षणार्थी अधिकारी यांनी कार्यमुक्ती आदेशाची मुळ प्रत व शासकीय ओळखपत्र स्वत: जवळ बाळगणे आवश्यक आहे.

४. प्रशिक्षण कार्यक्रमाचे पहिले सत्र सुरु होण्याच्या एक दिवस अगोदर किंवा प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी स.०८.००वा.पर्यंत प्रबोधिनी येथे हजर होणे आवश्यक आहे.प्रशिक्षण सत्र सुरू झाल्यानंतर प्रशिक्षणार्थीस कोणत्याही सबबीवर रुजू करून घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

संदर्भ क्रं. ३ अन्वये विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख यांचेवर उपरोक्त अटी व शर्ती नुसार पात्र अधिकारी/ कर्मचारी यांचे नामनिर्देशन करुन प्रशिक्षणास पाठविण्याची जबाबदारी सोपविलेली आहे. संदर्भ क्रं.२ नुसार यापुढे दरवर्षी वेतनवाढ देताना अधिकारी/कर्मचारी यांनी नेमून दिलेले प्रशिक्षण पूर्ण केले किंवा कसे याची पडताळणी विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख यांनी करणे गरजेचे आहे.

संदर्भ १ शासन निर्णय दि.२३ सप्टेंबर २०११ मधील परिच्छेद ६ नुसार प्रशिक्षणासाठी नामनिर्देशन होवूनही संबंधित अधिकारी अपवादात्मक परिस्थिती वगळता गैरहजर राहिल्यास तसेच सुट मिळण्यासाठी सक्षमप्राधिकाऱ्यांकडून मान्यता न घेतल्यास त्यांच्या विरुध्द म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या



Scanned by CamScanner

तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात यावी, तसेच प्रशिक्षणार्थी अनुपस्थित राहिल्यास किंवा प्रशिक्षणादरम्यान शिस्तभंगाची कार्यवाहीस्तव कार्यमूक्त करण्यात आल्यास प्रतिदिन रु.१५००/-प्रमाणे पूर्ण सत्राचे रक्कम त्या व्यक्तीच्या पगारातून कपात करुन संबंधित प्रशिक्षणसंस्थेच्या खात्यावर वसुली म्हणून वरीष्ठाव्दारे जमा करावी व या वसुलीची नोंद त्याव्यक्तीच्या सेवापुस्तिकेत घेण्यात यावी, असे निर्देश आहेत, ही बाब नामनिर्देशित अधिकारी/ कर्मचारी यांना निदर्शनास आणून द्यावी.

**उपरोक्त सर्व अटी व शर्ती विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी संबधितांना निदर्शनास आणून द्याव्यात व प्रशिक्षणास कार्यमुक्त करण्यात यावे.**

(**टीप** -संस्था ही औरंगाबाद येथून ५० कि.मी. अंतरावर असून पैठण येथून ५ कि.मी. अंतरावर आहे. औरंगाबाद-पैठण मुख्य रस्त्यावरुन संस्था ५०० मीटर अंतरावर पश्चिमेस आहे. संपूर्ण तपशिल संस्थेच्या www.madta.in या संकेतस्थळावरील contact us या लिंकवर उपलब्ध असून Google map च्या सहाय्यानेसहज पोहचता येणे शक्य आहे.)

11.02.2020
(संदिप काळे)
**निबंधक**
मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाथनगर(उत्तर)पैठण,जि.औरंगाबाद.

प्रतिलीपी:-१) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.उपसचिव,सामान्य प्रशासनविभाग,(१२-अ)मंत्रालय,मुंबई-३२यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) मा.संचालक, राप्रनिमुयं, यशदा, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

स्वा/-
(संदिप काळे)
**निबंधक**
मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाथनगर(उत्तर)पैठण,जि.औरंगाबाद.



Scanned by CamScanner